# 'आशा'साठी
# पूरक प्रशिक्षण पुस्तक - ५



महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा,
'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान'साठी

साथी प्रकाशन

# ‘आशा’साठी
# पूरक प्रशिक्षण पुस्तक - ५



रूपांतर लेखन - डॉ. मोहन देशपांडे

**महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा,**

**‘राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान’साठी**

**साथी प्रकाशन**

# आभार

- महाराष्ट्रातील आदिवासी भागातील केवळ कमी शिकलेल्या 'आशा'साठी नाही तर आदिवासी भागातील सर्व 'आशां'च्या प्रशिक्षणासाठी 'पूरक साहित्य' म्हणून या पुस्तकाची निवड केल्याबद्दल श्रीमती सोनिया सेठी, संचालक, 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान' महाराष्ट्र; डॉ. सतीश पवार, उपसंचालक, 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान' महाराष्ट्र; आणि श्रीमती वंदना कृष्णा, कमिशनर, कुटुंब कल्याण विभाग यांचे आभारी आहोत.
- या पुस्तकाच्या मसुद्याची छाननी करून त्यात काही ठोस सुधारणा सुचवल्याबद्दल प्राचार्य दास, आरोग्य व कुटुंबकल्याण केंद्र, नागपूर, तसेच सारिका चतुर्वेदी, एफ.आर.सी.एच., पुणे यांचे आभार.
- चंद्रशेखर जोशी यांनी वेळेवर सुयोग्य रेखाचित्रे काढून दिली आणि एन. आर. एंटरप्रायझेसने कमी वेळात छपाई करून दिली याबद्दल त्यांचे आभार.
- या पुस्तकाला आकार देण्यासाठी 'साथी'च्या -
  - भाग्यश्री खैरे, शकुंतला भालेराव यांनी डॉ. अनंत फडके यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या प्रकारे पाठपुरावा करून भरीव योगदान दिले;
  - शारदा महल्ले यांनी नेहमीच्या आत्मियतेने संगणकावर जुळवणी केली;
  - रवि मांडेकर व गजानन लोंढे यांनी हरप्रकारे प्रशासकीय सहकार्य दिले

  यासाठी या सर्वांचे आभार.

***

# 'आशा'साठी दोन शब्द




'आशा' म्हणून काम करण्यासाठी तुमचे प्रशिक्षण चालू आहे. त्यातील पहिली चार प्रशिक्षण शिबीरे झाली. या प्रशिक्षणासाठी मदत व्हावी म्हणून 'आशासाठी पूरक प्रशिक्षण पुस्तके' तुम्ही वापरली. आता या पाचव्या शिबीरासाठीही हे पूरक प्रशिक्षण पुस्तक तुमच्या हातात ठेवायला आम्हाला आनंद होत आहे.

तुमची मातृभाषा मराठी नसून स्थानिक आदिवासी भाषा आहे; तुम्ही शाळा सोडूनही काही वर्षे झाली आहेत. म्हणून तुमच्यासाठी पहिली चार आशा प्रशिक्षण पुस्तिके चित्ररुप बनवली आहेत. या पाचव्या पूरक प्रशिक्षण पुस्तकाचा विषय जरा वेगळा आहे. त्यामध्ये गावात 'आशा कार्यकर्ती' म्हणून काम करतांना तुमच्या अंगी कोणते गुण व कौशल्ये असायला हवी, स्त्री-पुरुष समानता, मानवी हक्कांचा आदर इत्यादी मूल्ये मनाशी बाळगून काम कसे करायचे हा या पुस्तकाचा विषय आहे. त्यासाठी तुम्हाला विचार करायला हवा की आज तुम्हाला स्वतःबद्दल काय वाटते; आपल्याला काय येते, काय येत नाही; आपल्या अडचणी कोणत्या; त्या दूर कशा करायच्या. त्याचप्रमाणे आपण चांगली कार्यकर्ती कशी होऊ शकतो? आपण आपल्या वस्तीतल्या लोकांना पटवून देऊ शकू का? लोक आपले केव्हा ऐकतील? लोकांना कोण कोणत्या सरकारी आरोग्य-सेवा मिळायला हव्या? आपल्याला आरोग्याबाबत जी निरनिराळी कामे प्रशिक्षणात शिकवली आहेत त्यासाठी सर्वांचे सहकार्य कसे मिळवायचे? सर्वांशी मेळ कसा घालायचा? अशा सर्व प्रश्नांची उत्तरे जरा वेगळ्या प्रकारची आहेत. त्यामुळे पहिल्या चार प्रशिक्षण पुस्तकांप्रमाणे मुख्यतः चित्रांच्या आधारे हा विषय समजावून सांगण्यापेक्षा वेगळी पद्धत वापरली आहे. मुख्यतः गोष्टींच्या रुपात या पुस्तकात विषय मांडला आहे. गोष्टी लहान-थोर सर्वांनाच आवडतात! या पाचव्या पुस्तकातल्या छोट्या कथा, छोटे प्रसंग यातून हा थोडा वेगळा, थोडासा अवघड विषयही तुम्हाला समजायला सोपा जाईल असा आम्हाला विश्वास वाटतो.

तुमच्यासाठी हे पुस्तक लिहिले आहे डॉ. मोहन देशपांडे यांनी. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने इंग्रजीत प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाचे हे मराठी रुपांतर डॉ. मोहन देशपांडे यांनी आदिवासी भागातील तुम्हा आशांसाठी खास सोपे करून लिहिले आहे. तुमच्यासारख्या स्त्रियांना आरोग्य-शिक्षण देण्याचे काम गेले २५ वर्षे ते करत आहेत. ग्रामीण आरोग्य कार्यकर्त्यांना विषय सोपा करून सांगण्याबाबत त्यांची ख्याती आहे. तुम्हालाही त्यांनी केलेले हे रुपांतर आवडेल असा विश्वास वाटतो.

हे पाचवे प्रशिक्षण शिबीर संपल्यावर 'आशा' म्हणून काम करायला तुमची पूर्ण तयारी होईल! तुमच्या कार्याला आमच्या शुभेच्छा!

डॉ. अनंत फडके
साथी

२८ फेब्रुवारी, २०१०
राष्ट्रीय विज्ञान दिन

# अनुक्रमणिका


| क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १. | अशी मी 'आशा' | १ |
| २. | आशा : एक सक्रिय कार्यकर्ती | ६ |
| ३. | 'आशा'नं कसं वागावं? | १५ |
| ४. | आपले मूलभूत मानवी अधिकार | २२ |
| ५. | आरोग्याचे आणि आरोग्य सेवांचे अधिकार | २७ |
| ६. | नेतृत्व माझे, साथ इतरांची! | ४० |
| ७. | अस्सा संवाद हवा गं बाई....! | ४५ |
| ८. | महत्त्व आहे निर्णयाचे! | ५३ |
| ९. | वाटाघाटीतून मार्ग निघतो! | ५५ |
| १०. | समन्वय कौशल्य | ५९ |